सध्याच्या काळात उपलब्ध हिरवा चारा विशिष्ट पद्धतीने मुरवून त्यापासून मुरघास तयार करावा. शेतीतील दुय्यम उत्पादनावर प्रक्रिया करावी. घरच्या घरी पशुखाद्य तयार करावे. अशा प्रकारे दुष्काळातील चाराटंचाईसदृश परिस्थितीमध्ये जनावरांच्या आहार व्यवस्थापनावर लक्ष ठेवावे.

# जनावरांना द्या प्रक्रियायुक्त चारा

प्रा. सागर सकटे, प्रा. मोहन शिंदे

गाई, म्हशींच्या व्यवस्थापनामध्ये जास्तीत जास्त खर्च हा जनावरांच्या आहारावर होत असतो. त्यामुळे पशुआहाराकडे विशेष लक्ष द्यावे. अनुवंशिकदृष्ट्या गाय किंवा म्हैस कितीही उच्च वंशावळीची असली तरी तिचे अनुवंशिक गुण प्रत्यक्ष दूध उत्पादनामध्ये उतरविण्याकरिता त्यांना संतुलित आहार देणे आवश्यक आहे.

## आहाराची मात्रा

साधारणपणे ४०० किलो वजन व १८ ते २० लिटर दूध उत्पादन असणाऱ्या गाईसाठी खालीलप्रमाणे आहार द्यावा. त्यामुळे गाईचे आरोग्य चांगले राहून दुग्धोत्पादनामध्ये सातत्य मिळते.

| | |
|---|---|
| हिरवा चारा | २०-२५ किलो |
| वाळलेला चारा | ४-६ किलो |
| पशुखाद्य | ६-७ किलो |
| खनिज मिश्रणे | ४०-५० ग्रॅम |
| स्वच्छ पाणी | ६०-७० लिटर |

## तयार करा पशुखाद्य

- संतुलित आहारामध्ये हिरवा आणि वाळलेला चारा याबरोबरच पशुखाद्य देणे आवश्यक आहे.
- प्रत्येक जनावरास एक ते दीड किलो पशुखाद्य शरीर पोषणासाठी द्यावे लागते. तसेच दुधाळ जनावरास प्रत्येक २.५ लिटर दुग्धोत्पादनासाठी एक किलो पशुखाद्य द्यावे लागते.
- घरच्या घरी पशुखाद्य तयार करून शेतकरी हा खर्च कमी करू शकतात. त्यामुळे पशुखाद्य तयार करण्यासाठी लागणारे घटक व टक्केवारीनुसार त्यांचे प्रमाण खालीलप्रमाणे असावे.

**घरगुती पशुखाद्य बनविण्याची पद्धत :**

| | |
|---|---|
| भरडलेले धान्य | २५-३० टक्के |
| भरडलेल्या डाळी | १०-१५ टक्के |
| गव्हाचा कोंडा | १०-१५ टक्के |
| सरकी पेंड | १०-१५ टक्के |
| तेलयुक्त पेंड | १५-२० टक्के |
| काकवी/गूळ | १-२ टक्के |
| क्षार मिश्रणे | १-२ टक्के |
| मीठ | १ टक्के |

## गहू, भात काडावर प्रक्रिया

- शेतकऱ्यांकडे काढणीनंतर गहू किंवा भाताच्या काडाचा वापर जनावरांच्या आहारात करावा. या काडाचे अधिक पचन व पौष्टिक करण्यासाठी त्यावर युरिया, मीठ व गूळ यांचे द्रावण शिंपडावे. युरियामुळे पिष्टमय घटक प्रमाणात विघटित होतात.
- १०० किलो वाळलेल्या काडावर प्रक्रिया करण्यासाठी ४० लिटर पाण्यामध्ये दोन किलो युरिया, एक किलो गूळ, एक किलो मीठ व एक किलो खनिज मिश्रणे मिसळून द्रावण तयार करावे.
- त्यानंतर काड जमिनीवर पसरावे. युरिया, गूळ, मीठ यांचे मिश्रण शिंपडावे. चारा आणि द्रावण चांगले मिसळून घ्यावे. मिश्रण प्लॅस्टिक पिशवीमध्ये भरून ठेवावे.
- चारा ते दोन दिवसांनी जनावरांच्या आहारात रोज तीन किलो या प्रमाणात वापरावे.



गहू, भाताच्या काडामध्ये युरिया, मीठ, गूळ, खनिज मिश्रणांचे द्रावण योग्य प्रमाणात मिसळून घ्यावे.



मुरघास तयार करण्यासाठी चाऱ्याची कुट्टी करावी.



पिशवीमध्ये योग्य प्रकारे चाऱ्याची कुट्टी भरावी. प्रत्येक थरावर युरिया, गूळ आणि मिठाचे द्रावण शिंपडावे.



जनावरांना रोजच्या आहारात मुरघास द्यावा.

## मुरघासाची निर्मिती

जनावरांच्या संतुलित आहारासाठी मुरघास तयार करावा. पोषक प्रमाणात मुरघास खड्ड्यामध्ये बनवता येतो. त्यासाठी जमिनीमध्ये योग्य आकाराचा खड्डा तयार करावा. खड्ड्यातील चाऱ्यात पाणी किंवा ओलावा आत येऊ नये याची खबरदारी घ्यावी. खड्ड्यामध्ये पक्का खड्डा किंवा खड्ड्याच्या भिंती सिमेंटने बांधून घ्याव्यात. जनावरांची संख्या कमी असल्यास अशा मुरघास प्लॅस्टिकच्या पिशवीमध्येसुद्धा बनवता येतो.

**मुरघासासाठी लागणारा चारा :**

- मुरघास बनविण्यासाठी एकदल पिके (मका, ज्वारी, बाजरी, ओट आणि गवत पिके), त्याचबरोबर द्विदल पिके (लसूण, चवळी, बरसीम, ल्यूसर्न) यांचा वापर करावा.
- एकदल पिकांच्या चाऱ्यामध्ये कर्बोदकांचे प्रमाण जास्त असल्यामुळे चांगल्या प्रतीचा मुरघास तयार होतो. त्यासाठी मका हे उत्तम पीक आहे.
- द्विदल पिकांत चाऱ्याची प्रथिने व खनिजांचे प्रमाण जास्त असते.

**प्लॅस्टिक बॅग सायलेज :**

प्लॅस्टिक बॅग ५ किलो, १० किलो, ५० किलो, १०० किलो, ५०० किलो, १००० किलो अशा प्रमाणात उपलब्ध आहेत. आपल्या गरजेप्रमाणे बॅग वापरता येतात. हाताळण्यासाठी सोप्या असतात.

**बंकर सायलेज :**

प्लॅस्टिक बंकर ५०० ते १००० लिटरचे असतात. ज्या ठिकाणी कमी प्रमाणात मुरघास तयार करायचा आहे आणि साठवणुकीची पद्धत सोपी करायची आहे, त्या ठिकाणी ही पद्धत अधिक उपयुक्त आहे.

**मुरघास तयार करण्याची प्रक्रिया :**

- चाऱ्याची १ ते २ इंच लांबीची कुट्टी कडबा कुट्टी यंत्राने करून घ्यावी.
- मुरघासासाठी तयार केलेल्या खड्ड्यामध्ये / पिशवीमध्ये कुट्टीचे थर लावावेत. त्यावर चारा दाबून घ्यावा, त्यामुळे चाऱ्यातील हवा निघून जाते.
- हवा राहिल्यास चाऱ्याला बुरशी लागते किंवा मुरघास खराब होतो. त्यामुळे हवाबंद स्थितीत मुरघास करावा.
- प्रतिटन कुट्टी केलेल्या हिरव्या चाऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी युरिया एक किलो, मीठ एक किलो, याशिवाय गूळ किंवा मळी दोन किलो आणि खनिज मिश्रण एक किलो २५ लिटर पाण्यामध्ये मिसळून त्याचे मिश्रण करावे. तयार झालेले मिश्रण कुट्टीवर शिंपडावे.
- कुट्टी व थरांवर मिश्रणाचे थर देऊन दाबून घ्यावे. हवा राहणार नाही याची दक्षता घ्यावी. त्यामुळे मुरघासाची गुणवत्ता चांगली राहते.
- खड्डा व्यवस्थित भरल्यानंतर त्यावर प्लॅस्टिकचा कागद टाकून हवाबंद करावे. त्यावर माती किंवा वाळलेल्या गवताचा थर पसरावा.
- हवाबंद केलेला मुरघास हा ४० ते ५० दिवस ठेवल्यास चाऱ्यामध्ये आंबवण्याची प्रक्रिया पूर्ण होऊन उत्तम दर्जाचा मुरघास तयार होतो.
- प्रत्येक जनावरास दररोज १० किलो मुरघास द्यावा. मुरघासाचे प्रमाण दूध उत्पादनावर अवलंबून आहे.

प्रा. सागर सकटे - ९४२३०४४३५१
(लेखक कृषी विज्ञान केंद्र, बोरगाव, जि. सातारा येथे विषय विशेषज्ञ (पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र) म्हणून कार्यरत आहेत.)